IMPACT FACTOR 6.20

ओ. मानमट

ISSN 2250-169X

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# VISION RESEARCH REVIEW

UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

**Issue - XX, Vol. - I**
Year-X, Bi-Annual(Half Yearly)
**(Dec. 2020 To May 2021)**

**CHIEF EDITOR**

Dr. Balaji G. Kamble
Professor & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur. (M.S.)India.

**SPECIAL EDITOR**

Dr. E. Sivanagi Reddy
'Sthapathi'
Dept of Archaeology & Museums,
Hyderabad (A.P.)

**EXECUTIVE EDITORS**

Dr. Sachin Napate
Pune, Dist. Pune .M.S.

Verena Blechinger Talcott
Director, Dept. of History
& Cultural Studies, University of Barlin.
Barlin. (Jermany)

Michael Strayss,
Director,
International Relation & Diplomacy,
Schiller International University,
Paris. (France)

Dr. Deelip S. Arjune
Professor, Head, Dept. of History
J. E. S. Mahavidyalaya,
Jalna, Dist. Jalna (M.S.)

Dr. Nilam Chhangani
Dept. of Economics,
S.K.N.G. College,
Karanja Lad, Dist. Sashim(M.S.)

Dr. Rajendra R. Gawhale
Head, Dept. of Economics,
G. S. College,
Khamgaon, Dist. Buldana (M.S)

**DEPUTY EDITORS**

Dr. Rajendra Ganapure
Professor,Head, Dept. of Economics,
S. M. P. Mahavidyalaya,
Murum, Dist. Osmanabad (M.S.)

Dr. B. K. Shinde
Professor, Head, Dept. of Economics,
D. S. M. Mahavidyalaya,
Jintur, Dist. Parbhani (M.S.)

Dr. Vijay R. Gawhale
Head, Dept. of Commerce,
G. S. Mahavidyalaya,
Khamgaon, Dist. Buldana (M.S.)

Bhujang R. Bobade
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Institute, Hyderabad. (A.P.)

Dr. Mahadeo S. Kamble
Dept. of History
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

Dr. S. R. Patil
Professor, Dept. of Economics,
Swami Vivekanand Mahavidyalaya,
Shirur Tajband, Dist. Latur(M.S.)

**CO - EDITORS**

Dr. Allabaksha Jamadar
Professor, Head, Dept. of Hindi,
B.K.D. College,
Chakur, Dist. Latur (M.S.)

Dr. Murlidhar Lahade
Dept. of Hindi,
Janvikas Mahavidyalaya,
Bansarola, Dist. Beed.(M.S.)

Dr. Shyam Khandare
Dept. of Sociology,
Gondawana University,
Gadhciroli, Dist. Gadchiroli (M.S.)

Dr. M. Veeraprasad
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, Dist. Anantpur (A.P.)

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 02382 -241913**
9423346913 / 7276301000
9637935252 / 9503814000

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published By :**
Jyotichandra Publication
Latur, Dist. Latur - 413531. (M.S.)

**Price : ₹ 200/-**

Issue : XX, Vol. I
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR
6.20
ISSN 2250-169X
Dec. 2020 To May 2021 

7

# कोव्हिड-१९ चा शिक्षणावर झालेला परिणाम

**डॉ. अलका अनिल मानकर**
अर्थशास्त्र विभाग,
श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालय,
नांदुरा (रेल्वे), जि. बुलढाणा

## Research Paper - Economics

**प्रस्तावना**

दुसऱ्या महायुध्दानंतरचे जगासमोरील सर्वात मोठे संकट म्हणजे कोरोना महामारी कोरोना महामारीमुळे संपूर्ण मानवी जीवन संकटात सापडले आहे. या वर अजून प्रतिजैविके न सापडल्यामूळे रोग होवू नये या करिता उपाय म्हणून लॉकडाउनचे धोरण अमलात आणण्याचे शासनाने ठरविले नव्हे ते मार्च महिन्यापासून प्रत्यक्षात अमलात आणी जात आहे या परिस्थितीमूळे सर्वत्र भितीयूक्त वातावरण पसरले आहे. जागतीक व देशाच्या अर्थव्यवस्था लॉकडाउनमूळे मंदी व बेरोजगाराच्या चक्रव्यूध्दात अडकल्यामूळे डळमळीत होत आहेत. लॉकडाउनमुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेवर अनेक सामाजिक आर्थिक परिणाम झालेले दिसतात. उदयोग व्यापार ठप्प झाले सवलतीच्या रिकामेपणामुळे व एकटेपणामुळे कौटुबिक सामाजिक, मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण होवू लागला आहेत. कोरोनाचा प्रार्दुभाव टाळण्याकरीता अनेक देशांनी शिक्षणसंस्था बंद केल्या आहेत.

कोरोना महामारी पूर्वी शिक्षणक्षेत्र अधिक गतिशील होते कारण १९९१ पासून नविन आर्थिक धोरण भारत देशाने स्विकारले जागकि स्पर्धेत टिकण्याकरीता अर्थव्यवस्थेत प्रत्येक क्षेत्रात झपाटयाने बदल करण्यात आले. आधूनिक अर्थव्यवस्था ज्ञानारधिष्ठित अर्थव्यवस्था मानली जाते. भारताच्या अर्थकारणाचे जागतिकिकरण घडुन येत असताना देशाच्या विकासाकरीता शासकिय स्तरावर अनेक योजना राबविल्या जात असताना शिक्षण क्षेत्रात परिवर्तन करणे काळाची गरज विचारात घेवून पावले उचललीजात आहेत काळानूरुप शिक्षण विद्यार्थ्यांना कसे मिळेल यासंदर्भात प्रक्रिया राबविली जाते आहे. देशाचा आर्थिक विकास त्या देशातील सक्षम नागरिकांवर अवलंबून असतो सक्षम

नागरिकांची जडणघडण करण्याचे कार्य शिक्षणप्रणाली करतो. गांधीजी या थोर तत्वज्ञाच्या मते शिक्षण म्हणजे व्यक्तिमत्व विकास घडवून आणण्याचे माध्यम शिक्षणच चारित्र्यसंपन्न मनुष्याची निर्मिती करु शकते शारिरीक, मानसिक, बौध्दीक चारित्र्य वाढविण्यासमदत करते त्यामूळे शालेय शिक्षण अत्यंत महत्वाचे आहे. २९ जुलै २०२० चे नविन शैक्षणिक धोरण ठरवताना श्रमाची प्रतिष्ठा वाढवणे आणि मुलांमधील आत्मविश्वास वाढविणे, कौशल्यावर आधारीत शिक्षणप्रणाली या उदिष्टयावर भर देण्यात आला जागतिकिकरणाच्या काळात शैक्षणिक क्षेत्रात झपाटयाने गतिशिलता निर्माणझाली शाळा, महाविदयालय इंग्रजी शिक्षणाचे वाढते स्त्रोत, शैक्षणिक संस्थाच्या संख्यात्मकतेत वाढ परंतू गुणात्मक दर्जाचे काय? बि.ए., बि.कॉम, बि.एस्सी, इंजिनिअरिंग, मेडिकल विविध व्यावसायिक अभ्यासकमात वाढ ठरविण्याच्या संख्येने दरवर्षी विदयार्थी डिग्री घेवून बाहेर पडतात परंतू हातात डिग्री चेहऱ्यावर प्रश्न रोजगाराचे काय? थोडक्यात देशातील वाढत्या बेरोजगारीचा प्रश्न अभ्यासताना शैक्षणिक बेकारीत होणारी वाढ हा ज्वलंत प्रश्न विकासाकडे वाटचाल करणा–या भारताच्या अर्थव्यवस्थेसमोर निर्माण झालेल पाहायला मिळतो अशी परिस्थिती देशासमोर असताना आकस्मिक निर्माण झालेली कोरोना महामारी ज्यामुळे देशातीलच नव्हे तर जागतिक स्तरावरील शैक्षणिक क्षेत्रात निर्माण झालेली बंद प्रक्रिया कोराना महामारीचे शैक्षणिक क्षेत्रावर अनेक दुरगामी परिणाम झालेले दिसतात युनेस्को च्या अहवालानूसार एप्रिल २०२० मध्ये १८८ देशात १५४ कोटी विद्यार्थी घरी बसले आहेत. भारतात १५लाख शाळा बंद आहेत. त्यामुळे २६ कोटी विद्यार्थी व ८९ लाख शिक्षक घरी बसले आहेत. तर उच्च शिक्षणात ५० हजार शिक्षणसंस्था बंद आहेत. १५ लाख महाविदयालयीन शिक्षक घरी बसले आहेत. ३० कोटी विदयार्थी रिकामे आहेत. कोरोना महामारीचा संसर्ग टाळण्याकरीता जे लॉकडाउन केले गेले त्यामुळे सर्व एकटपणाने जीवन जगत असताना विदयार्थ्यासमोर अनेक प्रश्न चिन्ह निर्माण झाले त्यामुळे समाजातील पालक, विदयार्थी शिक्षक यांची मानसिकता सबळ राहावी याकरीता दुरदर्शनवर धार्मिक मालिका सुरु केल्या गेल्या परंतु त्यामुळे प्रश्न सुटणार का?

शिक्षण क्षेत्रातील व्यत्यय दूर करण्याकरीता आभासी वर्गखोली (online classroom) माहिती तत्रंज्ञानाचा वापर यु–टयूब, मल्टिमिडिया, मोबाईल दूरध्वनी शिक्षण प्रक्रिया इ. माध्यमाचा वापर करुण शिक्षण प्रक्रिया सुरु ठेवण्याचे उपक्रम सुरु आहेत महाविदयालयीन स्तरावर विदयार्च्याच्या परिक्षांसंदर्भात संभ्रम मोठया प्रमाणात निर्माण झाले आहेत. थोडक्यात शैक्षणिक क्षेत्रात अनिश्चितता निर्माण झाली आहे.

आज प्राथमिक स्तरापासून तर महाविदयालयीन स्तरापर्यंत online शिक्षणप्रणाली राबविली जात आहे आर्थिकदृष्टया सक्षम असणारे विदयार्थी हा खर्च करु शकतात त्यामूळे त्याच्या शिक्षणात व्यत्यय जरी येत नसेल तरी ग्रामीण अर्थव्यस्थेतील विद्यार्थी यांना अनेक समस्यांना समोर जावे लागत आहे.

१. मध्यमवर्गीय विदयार्थ्याजवळ मोबाईल आहे परंतू ग्रामीण भागात नेटवर्कची समस्या
२. कष्टकरी, मजूर, भटके विभुक्त आदिवासी,गामीण भागातील विदयार्थ्यांना मोबाईलचा प्रश्न
३. अनेक शिक्षकांसमोरOnline अध्यापनांचा पुरेसे तंत्रज्ञानाचे ज्ञान नसल्यामुळे प्रश्न निर्माण होत आहेत.
४. विद्यार्थी व शिक्षकांमधील प्रत्यक्ष संपर्क नष्ट झाला त्यामुळे विदयार्थ्यांचे प्रश्न सोडवताना शिक्षकांसमोर अनेक अडचणी निर्माण होतात
५. माणुस माणसापसून दुर जात आहे.
६. खूप वेळ कम्पयूटर समोर बसल्यामुळे विदयर्थ्यांना शारिरीक मानसिक समस्येला तोंउ दयावे लागत आहे.
७. अभ्यासक्रमातील अपूर्णता
८. तंत्रज्ञानाव्दारे शिक्षण ध्यावे लागते त्यामुळे येणारा आर्थिक ताण
९. फायनल इयरच्या परिक्षा लांबल्यामुळे रोजगारीचा प्रश्न
१०. शिक्षण कर्जाच्या हप्त्यांचे दंडपण
११. इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सर्वत्र अप्रत्यक्ष रित्या संवाद साधताना निर्माण होणारी भाषेची अडचण

थोडक्यात लॉकडाउनमुळे भारतीय विद्यार्थी व पालक, शिक्षणसंस्था यांच्यासमोर अडचणीचे डोंगर उभे राहिले आहेत. परंतू कोरोना महामारीमुळे अनेक समस्या शैक्षणिक क्षेत्रात निर्माण झाल्या असल्या तरी त्या समस्येवर मात करण्याची ताकद शिक्षणच मनुष्याला देते कोरोना महामारी हे शिक्षणक्षेत्रासमोरील समस्या नसून ती माहिती तंत्रज्ञानाच्या बदलत्या काळानुसार एक संधी म्हणुन जर तिचा स्विकार केला तर निश्चितच अर्थव्यवस्थेसमोरील शैक्षणिक क्षेत्रातील आव्हान सर्व समाजमानव सहजरित्या पेलू शकेल एक नवी दिशा आज शिक्षणक्षेत्राला प्राप्त होईल त्याकरीता सकारात्मक मानसिकतेची गरज आहे.

कोरोना महामारीच्या काळात माहिती तंत्रज्ञानाचा वेग प्रचंड वाढला कोरानाचा

प्रसार होण्यापूर्वीही तो वाढलाच होता पण कोरोनाकाळात तो शिखरावर पोहचला आहे. आज संपूर्ण जग नव्या डिजिटलच्या दिशेने जात असताना आपला देश यात मागे पडून चालणार नाही. डिजिटल पेमेंट, ऑनलाइन मार्केटिंग, ऑनलाइन बँकिंग बरोबरच आज झपाट्याने वाढत आहे.

ऑनलाइन शिक्षणप्रणालीमुळे शिक्षणप्रक्रिया सुरळीत चालत असली तरी कोविड १९ चा उच्च शिक्षणावर दुरगामी परिणाम दिसून येतो अंतिम वर्षाचा कला, वाणिज्य, विज्ञान, इतर इंजिनिअरिंग आर्किटेक्चरसाठी प्रवेश परिक्षा लांबल्यामुळे विदयार्थ्यांच्या भविष्यातील शिक्षणावर विपरीत परिणाम होत आहे. सर्व विदयार्थ्यांमध्ये उदयाचे भविष्य चा प्रश्न निर्माण झाला आहे अनेकांना कोरोना महामारीमुळे नोकरी गमवावी लागली वेतन कपात सेक्टर बंद त्यामुळे कामगारांच्या हातातील क्रयशक्ती कमी झाली पालकांची आर्थिक क्षमता कमीझाल्यामुळे शैक्षणिक कर्ज घेणाऱ्या विदयार्थ्यांची संख्या वाढु लागली आपले पाल्य गावापासून दुर पाठविण्याची मानसिकता कोरोनाच्या धोक्यामूळे पालकांची बदल्यामुळे हॉस्टेलमधील प्रवेश कमी झाले घरी राहून स्थानिक पातळीवर शिक्षण देण्यास प्राधान्य दिले जात आहे. फिसपेमेंटमध्ये मोठी पोकळी जाणवू लगली

कोरोना महामारीला न घाबरता भविष्यातील बदलत्या शिक्षणप्रणाली समोरील एक संधी म्हणून विचार केला तर सकारात्मक परिणाम दिसून येतात.

१. कोरोनामहामारी अगोदर देशातील पदव्यूत्तर शिक्षण घेण्याकरीता परदेशात जाणाऱ्या विदयार्थ्यांची सख्या अधिक होती परंतू महामारीमुळे परदेशात जाणाऱ्या विदयार्थ्यांची संख्या कमी होवू शकते त्यामूळे निश्चितच हुशार विदयार्थ्यांच्या ज्ञानाचा फायदा देशाला मिळेल

२. कोरोना महामारीमुळे नोकरी गमावू शकणारे विदयार्थी आज शॉर्ट टर्म री—स्किलिंग कोर्सेस शोधू लागले

३. नवनविन तंत्रज्ञानामधील अभ्यासक्रमांची मागणी वाढू लागेल.

४. कौशल्यावर आधारित शिक्षणावर अधिकाअधिक भर दिला जात आहे.

५. ऑनलाईन शिक्षणप्रक्रियेला समोरे जाण्याकरीता शैक्षणिक संस्था सुसज्ज होत आहेत.

६. शिक्षक प्राध्यापकांना अध्यावत ऑनलाईन शिक्षण प्रक्रियेसंदर्भात प्रशिक्षण दिले जात आहे.

७. कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम चालविणारी संस्था विदयापीठे भविष्यातील बदलाव समोरे ग्रामीण भागामधील शाळा महाविदयालयीन व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांमधील प्रवेशात वाढझाली आहे

८. पालक विद्यार्थी आणि समाज देखील आनलाइन शिक्षणप्रक्रियेला प्रतिसाद देत आहेत.

**थोडक्यात कोविड —१९**

महामारीचा देशातील शिक्षणप्रणालीवर अनेक विधायक आणि विघातक परिणाम दिसून येतात कोरोनाचे संकट अजुन किती काळ राहणार हे कोणीही सांगू शकत नाही. त्यामुळे आज जरी शैक्षणिक खेळखंडोबा थांबविण्यासाठी ऑनलाइन शैक्षणिक प्रक्रिया सुरु करण्यात आली यासाठी तरी त्यामधील समस्या कशा टाळता येतील यासंदर्भा गांभिर्याने विचार करणे आवश्यक आहे.

थोडक्यात आज कोरोना महामारीच्या काळात संपूर्ण जगभरातील शिक्षणव्यवस्था संक्रमणवस्थेतून जात आहे. गुरुकुल शिक्षण पध्दतीपासून सुरु झालेली आपली शिक्षणप्रणाली आज ऑनलाइन शिक्षणप्रणाली पर्यत येवून पोहचली कोरोना महामारीमुळे विदयार्थी व शिक्षकांमध्ये जी दरी निर्माण झाली ती भरुण काढण्याचे काम निश्चित आनलाईन शिक्षणप्रक्रिया करीत आहे. आता वेळ आली आहे. जिथे प्रत्येक विदयार्थ्याला त्याच्या इच्छेने व त्याच्या गतीने शिकण्याची संधी मिळेल गरज आहे ती म्हणजे शिक्षक व शिक्षण खाते यांच्या तिव्र इच्छाशक्तीची दुरदर्शनवरील चॅनेलचा उपयोग करुन विदयार्थ्यांना शिक्षण देणे. शिक्षक, पालक, शिक्षण खाते सर्वांनी एकजूटीने ऑनलईन शिक्षणप्रणालीव्दारे कोरोना महामारीवर मात करण्याची.

## संदर्भ सूची :-

१. जगतिक अर्थव्यवस्थेवर कोविड— १९ चा प्रभाव, दै. लोकमत दि. ०१/०४/२०२०
२. दै. महाविदर्भ, ६ एप्रिल २०२०
३. डॉ. देसाई, डॉ.भालेराव — १९९९ भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन पुणे.